| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 08 Jun 2026 | Why the concept of 'insurance by usage'  is gaining momentum in 2026 | Kesari (Marathi) |

# २०२६ मध्ये 'वापरानुसार विमा' संकल्पना गती का पकडत आहे?

'वापरानुसार विमा' (Pay-s-You-Consume - PYC), ज्याला 'चालवाल तेवढाच विमा' (Pay-s-You-Drive) असेंही म्हटले जाते, ही संकल्पना भारतात अजूनही बऱ्यापैकी नवीन आहे. जानेवारी २०२० मध्ये 'भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने' आपल्या प्रायोगिक धोरणांतर्गत मान्यता दिल्यानंतर ती पहिल्यांदा सादर करण्यात आली होती. या महत्त्वपूर्ण टप्प्यापासून, विमा कंपन्यांनी वाहनाच्या प्रत्यक्ष वापरावर आधारित मोटर विमा उत्पादने बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. ही उत्पादने वाहनचालकांना, विशेषतः दरवर्षी कमी किलोमीटर गाडी चालवणाऱ्यांना अधिक लवचिकता आणि परवडणारा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी तयार केली गेली आहेत.

सुरक्षित आणि जबाबदार ड्रायव्हिंग करणाऱ्यांना बक्षीस देणाऱ्या, वापरावर आधारित मोटर विमा उत्पादनांसाठीच्या शासकीय धोरणांशी ही संकल्पना सुसंगत आहे. पारंपारिक मोटर विमा बऱ्याच काळापासून 'सर्वांसाठी एकच नियम' या पद्धतीवर चालत आला आहे, ज्यामध्ये वाहन किती वेळा किंवा किती सुरक्षितपणे वापरले जाते याचा विचार न करता सरसकट प्रिमियम आकारला जातो. 'वापरानुसार विमा' हा प्रिमियम थेट प्रत्यक्ष वापराशी जोडून हे समीकरण बदलतो. जे चालक त्यांच्या कारचा वापर कमी प्रमाणात करतात, सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून असतात किंवा ज्यांच्याकडे एकापेक्षा जास्त वाहने आहेत, अशा विशिष्ट ग्राहक वर्गासाठी सर्वसमावेशक संरक्षण मिळवत असतानाच विम्याचा खर्च कमी करण्याचा हा एक चांगला मार्ग ठरू शकतो.

## 'वापरानुसार विमा' म्हणजे काय आणि त्याचे ग्राहकांना कोणते फायदे आहेत?

नावाप्रमाणेच, या विम्याच्या बाबतीत, पॉलिसीधारक विमा खरेदी करताना त्यांच्या अपेक्षित वार्षिक किलोमीटरची घोषणा करतात. हा विमा सुरू करण्यासाठी, ग्राहकांना मुदत सुरू होण्यापूर्वी पुरावा म्हणून त्यांच्या कारच्या अंतर मोजणाऱ्या मीटरचा (ओडोमीटरचा) एक व्हिडिओ अपलोड करावा लागतो.

या प्रकारच्या पॉलिसी 'स्वतःच्या वाहनाच्या नुकसानीच्या' कव्हरच्या बाबतीत कमालीची लवचिकता देतात. विशेषतः अशा कार मालकांसाठी या पॉलिसी फायदेशीर आहेत. जे दररोज गाडी चालवत नाहीत, परंतु जेव्हा कधी चालवतात तेव्हा त्यांना मजबूत संरक्षण हवे असते. उदाहरणार्थ, मेट्रो किंवा बसने प्रवास करणारे परंतु, शनिवार–रविवार कार वापरणारे शहरी नोकरदार याचा फायदा घेऊ शकतात. त्याचप्रमाणे,



**राकेश कौल**

मुख्य वितरण अधिकारी– किरकोळ व्यवसाय, बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज अलायंझ जनरल इन्शुरन्स कंपनी)

एकापेक्षा जास्त वाहने असलेली कुटुंबे कमी वापरली जाणारी कार या विम्यांतर्गत आणून, सुरक्षेशी तडजोड न करता आपला खर्च मर्यादित करू शकतात. हे विमे परवडणारे असल्याने ते मोठ्या ग्राहक वर्गापर्यंत पोहोचतात आणि संकटकाळात विमा हा एक भक्कम आर्थिक आधार म्हणून काम करतो.

या विम्यात 'अतिरिक्त सवलतीचे किलोमीटर' आणि 'पुढील वर्षात वर्ग होणारे किलोमीटर' सारखे उत्तम पर्याय मिळतात. जर एखाद्याला विम्याच्या ठरलेल्या मर्यादेपेक्षा जास्त गाडी चालवण्याची अचानक आवश्यकता भासली. तर, 'अतिरिक्त सवलतीचे किलोमीटर' वाढीव संरक्षण देतात. तसेच, 'पुढील वर्षात वर्ग होणारे किलोमीटर' ग्राहकांना चालू वर्षातील न वापरलेले किलोमीटर पुढील विम्याच्या कालावधीत वापरण्याची परवानगी देतात, ज्यामुळे ग्राहकांना आपल्या पैशांचे पूर्ण मूल्य आणि विम्याचे सातत्य मिळते. एकत्रितपणे विचार केल्यास, ही वैशिष्ट्ये विम्याचे संरक्षण तुमच्या प्रत्यक्ष ड्रायव्हिंगच्या पद्धतीशी अधिक लवचिक बनवतात आणि पॉलिसीचे फायदे जास्तीत जास्त मिळवून देण्यास मदत करतात.

केवळ खर्च बचतीच्या पलीकडे जाऊन, सुरक्षित ड्रायव्हिंगला प्रोत्साहन देत हा विमा रस्ते सुरक्षेच्या उद्दिष्टांमध्ये मोलाचे योगदान देतो. वाहनाच्या प्रत्यक्ष वापराशी विम्याची सांगड घातली गेल्यामुळे, हा विमा चालकांना अधिक विचारपूर्वक आणि जबाबदारीने वाहन चालवण्यास प्रेरित करतो, ज्यामुळे रस्ते अपघात आणि क्लेम्सचे (दावे) प्रमाण कमी होते. यामुळे रस्ते तर सुरक्षित होतातच, शिवाय ग्राहकांना प्रिमियमवर बचत करण्याची संधीही मिळते.

**महत्त्वाची नोंद** : 'वापरानुसार विमा' किंवा प्रत्यक्ष वापरावर आधारित विमा उत्पादने हे पॉलिसीच्या अटी आणि शर्तींच्या अधीन आहेत. विम्याची वैशिष्ट्ये, फायदे आणि उपलब्धता ही उत्पादन आणि ग्राहकांच्या माहितीनुसार बदलू शकतात. वाचकांना सल्ला दिला जातो की, कोणताही खरेदीचा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी अधिकृत विमा दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

वापरकर्त्यांसाठी, हा पर्याय निवडल्याने मिळणारे संरक्षण हे थेट वाहनाच्या वापराशी सुसंगत राहते आणि खर्च आटोक्यात राहतो, तसेच सुरक्षित ड्रायव्हिंगचे कौतुकही होते. हा कल मोटर विम्याची रचना आणि त्याचा वापर कसा केला जात आहे. यातील एका मोठ्या आणि निर्णायक बदलाचा संकेत देतो. जसे–जसे याला कायदेशीर आणि नियामक सहकार्य मिळत राहील, तशी ही संकल्पना एका विशिष्ट मर्यादित वर्गापुरती न राहता मुख्य प्रवाहातील एक लोकप्रिय पर्याय बनण्याच्या दिशेने सज्ज आहे.